अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती.

# NOTICE

Notice No 606 . Displayed on- 01/02/2024

## वरिष्ठ महाविद्यालयातील बी.बी.ए, बी.बी.ए.(सी.ए.), एम.एस्सी. (संगणकशास्त्र) या शाखेमध्ये शिक्षण घेत असलेल्या एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या जात संवर्गातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना:—

महाराष्ट्र शासन इतर बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक : शिष्यवृत्ती — २०२३/प्र.क्र.१०१/शिक्षण —१ या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३—२४ पासून वरिष्ठ महाविद्यालयातील एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, या कॅटेगरीतील बी.बी.ए (प्रथम ते तृतीय वर्ष) व बी.बी.ए. (सी.ए.)(प्रथम ते तृतीय वर्ष) तसेच एम.एस्सी.(संगणकशास्त्र) भाग १ व भाग २ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. याची वरील वर्गाच्या संबधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

### ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.

२. सन २०२२—२३ मधील तहसिलदारांचा वडीलांचेनावे उत्पन्नाचा दाखला असने आवश्यक आहे. स्कॉलरशिपसाठी उत्पन्नाची मर्यादा रु. १,५०,०००/— (एक लाख पन्नास हजार एवढी आहे.) तसेच फ्रिशिपसाठी ८,००,०००/— आठ लाख एवढी उत्पन्न मर्यादा आहे.

३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.

४. आधारकार्ड झेरॉक्स जोडावी व आधारकार्ड बॅंकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक आहे.

५. मागील वर्षीचे मूळ गुणपत्रकाची झेरॉक्स आपलोड करणे आवश्यक आहे. ऑनलाईन मार्कशीट अपलोड करु नये अन्यथा फॉर्म रिजेक्ट हाईल.

६. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट अपलोड करणे आवश्यक आहे.

७. डोमासाईल सर्टिफिकेट अपलोड करणे आवश्यक आहे.
८. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. जोडावा.
९. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ चे प्रवेश फी चलन अपलोड करावे.
१०. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करणे आवश्यक आहे.
११. इयत्ता १० वी व १२ वी चे मार्कशीट जोडावे.
१२. बी.बी.ए. (सी.ए) च्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटीवर फॉर्म भरताना बी.सी.ए. (कॉमर्स) हा कोर्स सिलेक्ट करावा.

विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म कसा भरावा याबाबत महत्वाची सूचना:—

१. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.
२. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.
३. विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचे फॉर्म भरल्यास एका योजनेचा फॉर्म रिजेक्ट होते व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांनी शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशीपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.
४. विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/सिलेक्ट करावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College (0)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य